सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी बिल्डींग, तळ मजला, जे. टाटा मार्ग ,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.
**दुरध्वनी क्रमांक ०२२- २२८८०१०६/२२८८०१०७** **email: aotraining-dat @ mah.gov.in**

---

संदर्भ:- १) वित्त विभाग अधिसूचना क्र.परीक्षा-२००८/प्र.क्र.९५ (भाग दोन)/कोषा (प्रशा-३), दि.०३.०३.२०१२ .
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. विपधो २६२०/प्र.क्र.१६/का-१७, दिनांक ३१.०३.२०२१
३) संचालनालयाचे परिपत्रक क्र.संलेको/परीक्षा-१७/११ वी म.ले.स्था.नि.ले.वि.परीक्षा / २०२४/१११, दिनांक २५.११.२०२५
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र.दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दि.०५.१०.२०२१

---

क्रमांक : संलेको/परीक्षा-२०२५/११ वी म.ले.स्था.नि.ले.वि.परीक्षा/वेळापत्रक/ १८५ दि. 15 DEC 2025

# -:परिपत्रक:-

११ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट-क सेवा विभागीय परीक्षा भाग-१ व भाग-२ ही दि.१७.०१.२०२६ ते २०.०१.२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येत असून सदर परीक्षेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

## ११ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट क विभागीय परिक्षेचे वेळापत्रक (दि.१७.०१.२०२६ ते २०.०१.२०२६)

### भाग-१

| परीक्षेचा दिनांक व वार | परीक्षेची वेळ | पेपर क्रमांक | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १७/०१/२०२६ शनिवार | १०.०० ते १.०० | पेपर क्र. १ | सामान्य विषय कार्यालय रचना, कार्यालयीन कार्यपध्दती, मसुदा लेखन व टिप्पणी (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | २.३० ते ५.३० | पेपर क्र. २ | सामान्य विषय सर्वसाधारण प्रयुक्ती नियम व नियमपुस्तिकां (पुस्तकांशिवाय) | १०० |

| परीक्षेचा दिनांक व वार | परीक्षेची वेळ | पेपर क्रमांक | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १८/०१/२०२६ रविवार | १०.०० ते १.०० | पे.क्र.३ (क) | विशेष विषय (पुस्तकासह) (लेखा व कोषागारे संचालनालय आणि त्यांचे अधिनस्त दुय्यम कार्यालये यांच्यासाठी) | १०० |
| | | पे.क्र.३ (ख) | विशेष विषय (पुस्तकासह) (अधिदान व लेखा कार्यालय) मुंबई कार्यालयासाठी) | १०० |
| | | पे.क्र.३ (ग) | विशेष विषय (पुस्तकासह) (मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, मुंबई आणि त्यांच्या अधिनस्त दुय्यम कार्यालये यांच्यासाठी) | १०० |
| | | पे.क्र.३ (घ) | विशेष विषय (पुस्तकासह) (जिल्हा कोषागारे व उपकोषागारे कार्यालयासाठी ) | १०० |
| भाग-२ | | | | |
| १८/०१/२०२६ रविवार | २.३० ते ५.३० | पे.क्र. १ | सेवा नियम (पुस्तकांशिवाय) | १०० |
| १९/०१/२०२६ सोमवार | १०.०० ते १.०० | पे.क्र. २ | लेखा नियम व कोषागार नियम (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | २.३० ते ५.३० | पे.क्र. ३ | वित्तीय नियम (पुस्तकांशिवाय) | १०० |
| २०/०१/२०२६ मंगळवार | १०.०० ते १.०० | पे.क्र. ४ | संक्षेपण व मसुदा लेखन (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | २.३० ते ५.३० | पे.क्र.५ (क) | विशेष विषय प्रात्यक्षिक (कोषागारे) (पुस्तकांसह) | १०० |
| | | पे.क्र.५ (ख) | विशेष विषय[स्थानिक निधी लेखा कार्यालयासाठी] (पुस्तकांसह) | १०० |
| | | पे.क्र.५ (ग) | विशेष विषय [अधिदान व लेखा कार्यालयासाठी] (पुस्तकांसह) | १०० |
| | | पे.क्र.५ (घ) | विशेष विषय [संचालनालय व प्रादेशिक कार्यालये] (पुस्तकांसह) | १०० |
| | | पे.क्र.५ (ङ) | विशेष विषय [जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील कर्मचा-यांकरीता] (पुस्तकांसह) | १०० |
| | | पे.क्र.५ (च) | विशेष विषय [वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील कर्मचा-यांकरीता ] (पुस्तकांसह) | १०० |

सूचना : भाग-१ मधील पे.क्र. ३ व भाग-२ मधील पेपर क्रमांक ५ हा उपरोक्त विवरणपत्रात दर्शविलेल्या विशिष्ट विभागातील कर्मचा-यांकरीता आहे.

## ११ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट क सेवा विभागीय परीक्षा विभागनिहाय परीक्षा केंद्राचा तपशिल

१) अमरावती विभाग:- महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र, ३ रा मजला, लेखाकोष भवन, विद्यापिठ रोड, अमरावती ४४४ ६०२.

२) छत्रपती संभाजी नगर विभाग:- शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, सुभेदारी गेस्ट हाऊस जवळ, हिमायत बाग, छत्रपती संभाजी नगर ४३१००१

३) कोकण विभाग :- सेंट जॉन द बाप्टिस्ट हायस्कूल ॲन्ड ज्यु.कॉलेज, जांभळीनाका, तलावपाळीसमोर, ठाणे (प) ४०० ६०१ .

४) नागपूर विभाग :- संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, दक्षिण अंबाझरी रोड, अंध विद्यालयासमोर, श्रध्दानंद पेठ, दिक्षा भूमी जवळ, नागपूर ४४० ०२२.

५) नाशिक विभाग :- शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र तथा औद्योगिक शाळा, जुना आग्रा रोड, त्र्यंबक नाका, आदिवासी विकास भवन शेजारी, नाशिक ४२२ ००२.

६) पुणे विभाग :- शासकीय तंत्रनिकेतन, पुणे, पुणे विद्यापीठ मार्ग, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे ४११ ०१६ .

उमेदवाराने त्याच्या परिक्षेच्या अर्जात नमूद केलेले कार्यालय व त्याचे सद्यस्थितीतील कार्यालय यामध्ये बदल असल्यास उमेदवाराने त्याच्या सद्यस्थितीतील कार्यालय प्रमुखाकडून ओळखपत्र साक्षांकित करुन घ्यावेत व ते परिक्षेस बसताना ग्राह्य धरण्यात येईल.

तसेच दिव्यांग उमेदवार असल्यास उपरोक्त संदर्भ क्र.४ वरील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील परिपत्रकान्वये कार्यवाही करावी.

परीक्षेला येतांना फोटो असलेले व कार्यालय प्रमुखाने साक्षांकित केलेले ओळखपत्र घेवून यावे तसेच उमेदवाराने स्वत:चे शासकीय ओळखपत्र घेऊन यावे, अन्यथा परीक्षेला प्रवेश नाकारण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

याबाबत असेही सूचित करण्यात येते की सर्व विभागीय सहसंचालकांनी त्यांचे विभागासाठी केंद्र प्रमुखांचे नेमणूक आदेश निर्गमित करावेत व त्या आदेशाची प्रत या संचालनालयास पाठवावी.

मा.संचालक यांचे मान्यतेने

15.12.2025

(हेमंत जाधवर)
उपसंचालक (प्रशिक्षण),
संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई ४०० ०३५.
२. मंत्रालयातील सर्व विभाग / सर्व विभाग प्रमुख
३. सर्व विभागाचे आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
६. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन नवी मुंबई.
७. सह संचालक, लेखा व कोषागारे, पूणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद/कोकण विभाग
८. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा पूणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद/कोकण विभाग.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
११. सर्व कोषागार अधिकारी.
१२. सहाय्यक संचालक (प्रशिक्षण), लेखा व कोषागारे, पूणे / नाशिक / नागपूर / अमरावती / औरंगाबाद/ कोकण विभाग
१३. सर्व उपमुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी लेखा कार्यालय.
१४. इतर कार्यालये.

Photo

# ओ ळ ख प त्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती / कुमारी ------------------------------------ हे /हया ------------------------------------------------------------------------------------ या कार्यालयात ---------------------------- म्हणून काम करीत असून त्यांना ११ वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा सेवा गट क विभागीय परीक्षा भाग-१ व २ परीक्षेस बसण्यासाठी लेखा व कोषागारे संचालनालयाकडून परवानगी मिळालेली असून बैठक क्रमांक ................आहे. कर्मचा-यांने खाली* माझ्या समक्ष सही केली आहे.

कार्यालयीन अधिका-याची दिनांकित सही व शिक्का

## उमेदवारांसाठी सूचना

उमेदवाराने खाली दर्शविलेल्या गोष्टी केल्याचे आढळून आले तर जसे,

१. उमेदवाराने परीक्षागृहात पुस्तक, नोंदवही, कच्चे कागद इत्यादी आणल्यास तसेच परवानगी असलेल्या कार्यालयीन / शासकीय प्रकाशनाव्यतिरीक्त इतर वा अन्य खाजगी प्रकाशने आणल्यास,
२. परीक्षा चालू असतांना उमेदवाराने दुस-या उमेदवाराशी बोलण्याचा अथवा चर्चा करण्याचा प्रयत्न तथा चर्चा केल्यास,
३. उमेदवाराने परीक्षागृह सोडताना कोरी अथवा लिहिलेली उत्तरपत्रिका नेण्याचा प्रयत्न केल्यास, व
४. निरीक्षक व पर्यवेक्षक यानी दिलेल्या सूचनांची अवज्ञा केल्यास अथवा त्यांच्याशी उध्दटपणाचे वर्तन केल्यास,

तर उमेदवाराची परवानगी रद्द करण्यात येईल व त्याच्यावर पुढील योग्य कारवाई करण्यासाठी त्याचे नाव सक्षम अधिका-यांना कळविण्यात येईल याची त्यांनी कृपया नोंद घ्यावी.

जर एखाद्या उमेदवाराला परीक्षागृहातून बाहेर पाठविण्यात आले तर, त्याने परीक्षागृह सोडण्यापूर्वी पर्यवेक्षकामार्फत लेखी निवेदन या कार्यालयास सादर केले पाहिजे. पर्यवेक्षकांकडून याबाबतचा अहवाल केंद्रप्रमुखार्मात संचालनालय, लेखा व कोषागारे कार्यालयास सादर केला जाईल.

वरील सर्व सूचनांची नोंद घेतली आहे.

*परीक्षार्थीची सही :- माझ्या समक्ष सही केली

दिनांक : कार्यालयीन अधिका-याची दिनांकित सही व शिक्का

टीप :- उत्तरपत्रिका उमेदवारांना पुरविण्यात येतील. लिहिण्याचे साहित्य शाई, पेन वगैरे व पुस्तके मात्र उमेदवारांनी स्वत:च आणावयाची आहेत. पुस्तके पर्यवेक्षकांना अर्धा तास आधी दाखवून मगच उपयोगात आणावीत पुस्तकात कोठेही हस्तलिखित दुरुस्त्या व मजकुर असू नये.